महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
९ वा मजला, नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
Email ID :medd.prasha२@mah.gov.in दुरध्वनी क्र. ०२२ २२७१९४८०

---

तात्काळ

क्रमांक : वैशिवि-०२२४/प्र.क्र.४०/प्रशा-२, दिनांक : १६ मे, २०२५

प्रति,

१. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई.
२. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.

**विषय** - शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्याबाबत.

**संदर्भ**- शासन निर्णय क्र. वैशिवि-०२२४/प्र.क्र.४०/प्रशा-२, दिनांक १५.०२.२०२४

उपरोक्त विषयांकित प्रकरणी डॉ. अण्णासाहेब शहाजीराव टेकाळे, महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ यांचे दिनांक २०/०४/२०२५ रोजीच्या पत्राची प्रत सोबत जोडले आहे.

२. विभागाच्या दिनांक १५.०२.२०२४ रोजीच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये ६० वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून दोन वेळा मोफत आरोग्य, आठवड्यातून दोन दिवस ज्येष्ठ नागरिक तपासणीसाठी राखीव, आभा कार्ड उपलब्ध करून देणे, तपासणीत आजार आढळल्यास महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या उपचार करुन देणे इत्यादी. सुविधा देण्यात येत आहे. तथापि, सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी बहुतेक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात होत नसल्याचे उपरोक्त तक्रारीत नमूद केले आहे.

३. तरी, ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य सुविधाबाबतच्या दिनांक १५.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाच्या अमंलबजावणी बाबत आपल्यास्तरावरुन नियमित आढावा घेऊन, संबंधितांना सूचना द्याव्यात. तसेच, सदर प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा कार्यानुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा, ही विनंती.

**(म. गि. जोगदंड)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत - निवडनस्ती (प्रशा-२) .